नि.फौ.प्र.क्र.३५२/२०२२
सरकार/ अंकुश व इतर
निशाणी – ३४

**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ०२ यांची जबानी**

मी याद्वारे प्रतिज्ञापुर्वक निवेदन करतो की –
माझे नाव: सुनिल सुरेश वाघ,
वयः ४१ वर्षे, व्यवसायः मजुरी,
निवासस्थान: साखरवाडी, फुलेनगर, ता. फलटण, जि. सातारा.

**शपथेवर सरतपासणी सहा. सरकारी अभियोक्ता श्रीमती एस. एस. मुळीक यांच्यामार्फत दुपारी १२.४५ वाजता सुरू**

घटना दिनांक १४/०६/२०२१ रोजी दुपारी ४.०० वाजता साखरवाडी, फुलेनगर येथे घडली होती. त्यावेळी मी माझ्या घरामध्ये होतो. माझ्या सोबत त्यावेळी माझी पत्नी स्नेहा, मुल व चुलत बहीण रुपाली ही सुध्दा होती. आम्ही गप्पा मारत बसलो होतो. त्यावेळेस अंकुश वाघ, राहुल वाघ, राजेंद्र वाघ व करिष्मा चव्हाण आम्हाला न विचारता अचानक आमच्या घरात घुसले. त्यावेळी त्यांनी मला शिवीगाळ करुन हाताने मारले. त्यानंतर त्यांनी मला लाथांनी सुध्दा मारले. त्यांनी मला मारहाण केली कारण त्यांचे मत होते की, मी त्यांच्या बहीणीला त्रास देतो. मी आरडाओरडा केल्यानंतर राहुल वाघ, प्रकाश वाघ, हणुमंत कुऱ्हाडे, रुपाली वाघ व माझी पत्नी स्नेहा वाघ यांनी सोडवा सोडव केली. त्यानंतर मी साखरवाडी येथील पोलीस स्टेशनला जावुन तक्रार केली. आता मला अभिलेखावरील सदरची तक्रार दाखविण्यात आली. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकुर बरोबर आहे. म्हणून त्यास **नि.क्र.३५** देण्यात आले.

२. दिनांक १५/०६/२०२१ रोजी पोलीस सावंत सकाळी १०.०० वाजता माझ्या घरी पंचनाम्या करीता आले होते. त्यावेळी मी त्यांना घटनेचे ठिकाण दाखविले होते. त्यावेळी तेथे राहुल वाघ व हणमंत कुऱ्हाडे हे सुध्दा हजर होते. पंचनाम्याची कार्यवाही सकाळी १०.०० ते ११.०० च्या दरम्यान झाली होती. पोलीसांनी पंचनाम्यावर माझी सही घेतली होती. आता मला नि.क्र.२६ वरील पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर माझी सही आहे. मी सर्व आरोपींना पाहुन ओळखु शकतो. आज न्यायालयात अंकुश वाघ, राहुल वाघ व करिष्मा चव्हाण हजर आहेत.

## आरोपींतर्फे उलटतपास श्री. आय. सी. खान वकील यांच्यामार्फत

३. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी करिष्मा हीचा पती लक्ष्मण हणमंत चव्हाण हा माझ्या मामांचा मुलगा आहे. हे म्हणणे खरे आहे की, सर्व आरोपी माझ्या नात्यातील असल्यामुळे मी त्यांना ओळखतो.

४. हे म्हणणे खरे आहे की, आमची मजुर संस्था आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्या मजुर संस्थेमध्ये आरोपी करिष्माचा नवरा हा सभासद आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्या संस्थेमध्ये माझ्या कामावर तो ठेकेदार म्हणून किंवा मजुर म्हणून कामावर असतो. हे म्हणणे खरे आहे की, लक्ष्मण हा दारु पितो. हे म्हणणे खरे आहे की, माझे लक्ष्मण याच्या घरी जाणे येणे आहे. हे म्हणणे खरे आहे की, लक्ष्मणचे वडील हणमंत हे दिनांक १२/०५/२०२१ रोजी मरण पावले.

५. हे म्हणणे खरे आहे की, हणमंत यांच्या नावाने साखरवाडी येथे बँक ऑफ महाराष्ट्र, आय.डी.बी.आय. बँक शाखा– साखरवाडी व गुरुकृपा पतसंस्था येथे पैसे ठेव म्हणून ठेवलेले होते. हे म्हणणे खरे नाही की, त्या ठेवमध्ये ठेवलेले ११ लाख रुपये लक्ष्मण याला काढायचे होते परंतु त्याची पत्नी करिष्मा व आई कुसुम हे सही देत नव्हते म्हणून तो त्यांना शिवीगाळ करुन मारहाण करायचा.

६. हे मला माहीती नाही की, दिनांक १४/०६/२०२१ रोजी लक्ष्मणने दारु पिवुन करिष्मा हिच्या डोक्यावर दगडाने मारहाण केली किंवा कसे. हे मला माहीती नाही की, लक्ष्मणने नोकीया कंपनीचा मोबाईल दगडाने फोडून त्याचे नुकसान केले होते किंवा कसे. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळी मी सुध्दा तेथे उपस्थीत होतो व मी लक्ष्मण याची बाजु घेवुन करिष्मा व त्याच्या आईशी भांडत होतो. हे म्हणणे खरे आहे की, करिष्माने त्या दिवशी माझ्या विरुध्द व लक्ष्मण विरुध्द पोलीस स्टेशनमध्ये जावुन फिर्याद दाखल केली होती. हे म्हणणे खरे आहे की, करिष्माने माझ्या विरुध्द साखरवाडी पोलीस स्टेशन येथे फिर्याद दाखल केली होती याबाबत मला माहीती होती.

७. हे म्हणणे खरे आहे की, साखरवाडी येथे फुलेनगर हा मोठा परिसर आहे. हे म्हणणे

खरे नाही की, त्या ठिकाणी ७०० ते ८०० लोक राहतात. साक्षीदार स्वतःहुन सांगतो की, तेथे ३५० ते ४०० लोक राहतात. मी फुलेनगर येथे राहतो हे दर्शविण्याकरीता पोलीसांना मालकी बाबत ७/१२ चा उतारा किंवा मालमत्ता पत्रक दिले नव्हते. मी फिर्याद देतांना पोलीसांना घर क्रमांक किंवा घर कर पावती दिले नव्हते. तसेच मी पोलीसांना माझ्या घराचे विद्युत बिल सुध्दा दिले नव्हते. पोलीसांनी माझ्या घराचा फोटो काढला नव्हता.

८. हे म्हणणे खरे आहे की, मी ठेकेदार असल्यामुळे साखरवाडी परिसरातील सुपरिचीत व्यक्ती आहे. हे म्हणणे खरे नाही की, त्यामुळे साखरवाडी परिसरातील पुढारी, अधिकारी व पोलीस यांच्यासोबत माझे उठणे बसने असते. हे म्हणणे खरे नाही की, साखरवाडी पोलीस स्टेशन येथे माझे नेहमी जाणे येणे असते. हे मला माहीती नाही की, साखरवाडी येथे पोलीस दुरक्षेत्र असल्यामुळे तेथे नेहमीच पोलीस उपलब्ध नसतात किंवा कसे.

९. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी करिष्मा हिने माझ्या विरुध्द फिर्याद दाखल केली असल्यामुळे तीच्या फिर्यादीला शह देण्याकरीता मी प्रस्तुतची खोटी फिर्याद दाखल केली आहे. हे म्हणणे खरे आहे की, फुलेनगर येथे माझे घर नाही. साक्षीदार स्वतःहुन सांगतो की, तेथे त्याच्या वडीलांच्या नावे घर आहे. हे म्हणणे खरे नाही की, फुलेनगर येथे माझ्या वडीलांच्या नावे घर आहे असे मी खोटे सांगीतले.

१०. हे म्हणणे खरे आहे की, राहुल हणमंत वाघ हा माझा चुलत भाऊ आहे. हे म्हणणे खरे आहे की, हणमंत धीमा कुऱ्हाडे हे ठेकेदार असुन माझ्या परिचयाचे आहेत. हे म्हणणे खरे आहे की, विजय बाबुराव पवार व प्रकाश हणमंत वाघ हे सुध्दा माझ्या परिचयाचे आहेत. हे म्हणणे खरे नाही की, साक्षीदारांची नावे मी पोलीसांना सांगितले होते.

११. हे म्हणणे खरे नाही की, मी सांगीतल्याप्रमाणे कुठलीही घटना घडली नव्हती. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी क्र. २ राजेंद्र हा सांगली येथे राहतो. हे म्हणणे खरे आहे की, आरोपी करिष्मा ही मुंबई येथे राहते. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र.४ राहुल हा सांगली येथे राहतो. हे मला माहीती नाही की, आरोपी क्र. १ अंकुश हा कंपनीमध्ये कामाला आहे किंवा कसे. हे म्हणणे खरे नाही की, करिष्माने आमच्या विरुध्द तक्रार दिली त्यामुळे मी आरोपींविरुध्द

सदरची खोटी तक्रार दिली.

१२. हे म्हणणे खरे नाही की, घटनेच्या वेळी मी घरात असताना आरोपी न विचारता माझ्या घरामध्ये आले व त्यांनी शिवीगाळ करुन मला लाथा बुक्यांनी मारहाण केली असे मी खोटे सांगितले. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या सरतपासामध्ये आरोपींविरुध्द सांगितलेला संपुर्ण मजकुर खोटा आहे. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक १५/०६/२०२१ रोजी पोलीसांनी घटनास्थळ पंचनामा तयार केला असे मी खोटे सांगितले. हे म्हणणे खरे नाही की, पंचनाम्याच्या वेळी राहुल वाघ व हणमंत कुऱ्हाडे हे हजर होते हे मी खोटे सांगितले. हे म्हणणे खरे नाही की, मी आज न्यायालयात खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.
फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत
माझ्या समक्ष

ठिकाण – फलटण
दिनांक – १७/०८/२०२४

(आर. डी. भुयारकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, फलटण